रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३०
www.ramprahar.com
शुक्रवार, १६ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
‘मासळी निर्यात कंपन्या आता बंदरावरच येतील’/३
रायगडात भाजपतर्फे संविधान वाटप उपक्रम/५
रायगड पोलीस दलातील अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक/७

## अभियांत्रिकीच्या पहिल्या यादीत पावणेदोन लाख विद्यार्थी पात्र

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने बुधवारी रात्री अभियांत्रिकी प्रथम वर्ष (बीई/ बीटेक), एमबीए पदवी अभ्यासक्रमाची पहिली यादी जाहीर केली. अभियांत्रिकी प्रथम वर्ष (बीई/ बीटेक) अभ्यासक्रमासाठी अर्ज नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी एक लाख ७६ हजार १११ विद्यार्थी पहिल्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. यापैकी एक लाख २६ हजार ४५८ विद्यार्थ्यांना पहिल्या फेरीमध्ये प्रवेशाची संधी मिळाली आहे, तसेच व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या (एमबीए) प्रवेशासाठी ३३ हजार ९४२ विद्यार्थ्यांना पहिल्या फेरीमध्ये प्रवेशाची संधी मिळाली आहे. ४९ हजार ६५३ विद्यार्थ्यांची नावे प्रतीक्षा यादीत आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांना पुढील दोन फेऱ्यांमध्ये प्रवेशाची संधी मिळण्याची शक्यता आहे.

# भव्य दिव्य तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा जागर



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचा स्वातंत्र्य दिन विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा झाला. यामध्ये आणखी भर टाकली ती खारघरमध्ये झालेल्या भव्य दिव्य १११११ फूट तिरंगा पदयात्रेने. विशेष म्हणजे ही रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी तिरंगा पदयात्रा ठरली. ७८व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने खारघरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या देशभक्तीच्या उत्सवात हजारो नागरिक, विविध संस्था संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी सहभागी झाले होते.

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला आपला भारत देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारतवर लक्ष केंद्रित करून वाटचाल करीत आहे. स्वातंत्र्य दिनाचे प्रत्येक भारतीयासाठी विशेष महत्त्व आहे कारण या दिवशी केवळ आपला देशच स्वतंत्र झाला नाही तर या दिवसानंतर पहिल्यांदाच आपल्याला आपले मूलभूत अधिकार मिळाले. हा केवळ राष्ट्रीय सण नसून या देशाला स्वतंत्र करण्यासाठी ज्यांनी आपल्या तन, मन आणि धनाने बलिदान दिले, त्या शूर वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस आहे. त्या अनुषंगाने आजच्या तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा उत्सव अधोरेखित होत होता. भारत मातेचा जयजयकार आणि ढोलताशांच्या गजरात आसमंत दणाणून गेला होता.

खारघरमधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून या तिरंगा पदयात्रेला प्रारंभ झाला. या पदयात्रेत आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर,

(पान २ वर..)

## देशाला सेक्युलर सिव्हिल कोडची गरज -पंतप्रधान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाला कम्युनल नव्हे तर सेक्युलर सिव्हिल कोडची गरज असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना अधोरेखित केले. स्वातंत्र्याच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी (दि.१५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



त्या वेळी त्यांनी कायद्याला धर्माच्या नावाने विभाजित करीत असेल त्याला दूर केले पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

ते पुढे म्हणाले की, आपल्या देशात सुप्रीम कोर्टाने अनेकदा यूसीसीबाबत चर्चा केली. त्यावर आदेशही दिले कारण देशातील एक मोठ्या वर्गाला असे वाटते आपण जगत असलेली नागरी संहिता प्रत्यक्षात धार्मिक आणि भेदभावपूर्ण आहे. जो कायदा धर्माच्या आधारे विभाजन करतो, उच्च कनिष्ठ याचे कारण बनतो. त्या कायद्यांना आधुनिक समाजात स्थान असू शकत नाही. आता देशात धर्मनिरपेक्ष नागरी संहिता असावी, अशी देशाची मागणी आहे.

आपण कम्युनल सिव्हील कोडमध्ये ७५ वर्षे घालवली आहेत. आता आपल्याला सेक्यूलर सिव्हील कोड स्वीकारणे गरजेचे आहे. (पान २ वर..)



**पनवेल : भाजपच्या वतीने तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, अमित ओझे, अमरीश मोकल, महिला मोर्चा शहराध्यक्ष राजेश्री वावेकर उपस्थित होते.**

## निवडक

### सुरतजवळ अहमदाबाद-मुंबई एक्स्प्रेसचे दोन डबे घसरले

**सुरत :** गुजरातमधील सुरतजवळ गुरुवारी (दि.१५) सकाळी अहमदाबाद-मुंबई डबल डेकर एक्स्प्रेसचे दोन डबे घसरले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. पश्चिम रेल्वेने जारी केलेल्या निवेदनात याबाबत माहिती दिली. ही घटना सकाळी ८.५० वा.च्या सुमारास घडली.

### कार अपघातात दोघे ठार; दोन जण गंभीर जखमी

**वाशिम :** समृद्धी महामार्गावरील सेलू बाजार टोलनाक्यावर उभ्या असलेल्या ट्रकवर कार पाठीमागून जोरात आदळली. या भीषण अपघातात दोघे जागीच ठार झाले, तर दोन जण गंभीर जखमी झाले. ही घटना गुरुवारी (दि.१५) सकाळी घडली. पराग सोनार (वय ४४), अनुश पराग सोनार (वय ७, रा. नवी मुंबई) अशी मृतांची नावे आहेत, तर दिपाली पराग सोनार (वय ४०) व मुलगी रुजुल पराग सोनार (वय १७, रा. नवी मुंबई) अशी जखमींची नावे आहेत.

## लाडकी बहीण योजनेचा ८० लाख महिलांना लाभ

### महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांची माहिती | दोन महिन्यांचा सन्मान निधी थेट बँक खात्यात जमा

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभ वाटपाला बुधवारपासून सुरुवात झाली. याबद्दल महिला, बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आनंद व्यक्त केला आहे. या खात्याची मंत्री म्हणून राज्यातील भगिनींना या योजनेचा लाभ देण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते हे सांगतानाच ८० लाखांहून अधिक भगिनींना याचा लाभ आतापर्यंत देण्यात आला असल्याची माहिती ना. आदिती तटकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत १ ते ३१ जुलै या कालावधीत एक कोटी ४० लाखांपेक्षा अधिक अर्ज विभागाकडे प्राप्त झाले. त्यापैकी एक लाख ३५ हजार अर्जदार महिला या योजनेच्या लाभार्थी ठरल्या. बुधवारी जुलै आणि ऑगस्ट या



दोन महिन्यांचा सन्मान निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वितरीत करण्यास सुरूवात केली. बुधवार संध्याकाळपर्यंत जवळपास ३२ लाख तर गुरुवार पहाटेपासून ४८ लाख महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये जमा करण्यात आले. टप्प्याटप्प्याने उर्वरीत लाभार्थ्यांना निधी वितरीत केला जाणार आहे, अशी माहिती ना. आदिती तटकरे यांनी दिली.

योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्याने अनेक माता भगिनींनी फोन करून, सोशल मीडियावरून आनंद व्यक्त केला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून सुरू केलेली ही योजना अविरतपणे आणि यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

**आधार लिंक करण्याचे आवाहन**

अनेक लाभार्थी महिलांचे आधार कार्ड त्यांच्या बँक खात्याशी लिंक नाही त्यांच्या खात्यात अद्याप आम्ही पैसे टाकू शकलो नाही. अशी २५ ते ३० लाख खाती आहेत. अशा महिलांना खाते लिंक करण्यासाठी सहकार्य करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. अशा महिलांची खाती तसजशी आधार लिंक होत जातील तसतशी लाभाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.




**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या दोन्ही विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन, संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत, संस्थेचे उच्च शिक्षण समिती व जनरल बॉडी सदस्य कामगार नेते महेंद्र घरत आदी उपस्थित होते.**



पनवेल : हर घर तिरंगा अभियानांतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या निवासस्थानी ध्वजारोहण केले.

राम प्रहर संवादप्रहर
‘रामप्रहर’मध्ये वाचा नवे सदर संवादप्रहर...
विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी, पदाधिकारी आणि इतर क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती ‘रामप्रहर’च्या संवादप्रहर सदरामध्ये दर शनिवारी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. या शनिवारी आपल्या भेटीला येत आहेत...
आंतरराष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू प्रभात राजू कोळी.





अभीष्टचिंतन
श्री. अरुण नाईक
टीआयपीएलचे जनरल मॅनेजर (लेखा)
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
सौजन्य
शशिकांत मुंबईकर

# रायगड जिल्ह्यात स्वातंत्र्य दिनाचा उत्सव

## अलिबाग येथे शासकीय ध्वजारोहण



**रायगड : रामप्रहर वृत्त**

शेतकरी, कष्टकरी, आदिवासी, महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक अशा समाजातील सर्व घटकांसाठी राज्य सरकार अव्याहतपणे कार्य करीत आहे. हेच कार्य जोमाने पुढे घेऊन जाऊ आणि जनतेच्या जीवनात दृश्य परिवर्तन घडवू, अशी ग्वाही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्ताने महिला व बालविकास मंत्री आदिती वरदा सुनील तटकरे यांच्या हस्ते अलिबाग येथील पोलीस परेड मैदानात ध्वजारोहण झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, उप वनसंरक्षक राहुल पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, कार्यकारी अभियंता, सां.बा.अलिबाग जगदीश सुखदेवे, नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती मनिषा पिंगळे यांच्यासह जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## मध्यरात्रीच्या ध्वजारोहणास कर्जतकरांचा उदंड प्रतिसाद



कर्जत : प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनी कर्जत तालुका मराठी पत्रकार संघ आणि कर्जत प्रेस क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मध्यरात्रीच्या ध्वजारोहण समारंभास कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उदंड प्रतिसाद दिला. मध्यरात्रीच्या धवजारोहणाचे हे विसावे वर्ष आहे.

कर्जतच्या स्वर्गीय भाऊसाहेब राऊत चौकात १४ ऑगष्ट रोजी मध्यरात्री ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष ड. राहुल देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. चौकाच्या नामफलकालायांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर बरोबर बारा वाजून पाच मिनिटांनी राष्ट्रीय पॉवर लीफ्टींग खेळाडू अमृता भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कर्जत तालुका मराठी पत्रकार संघाच्या माजी अध्यक्ष वैदेही पुरोहित, ज्ञानेश्वर बागडे आदी उपस्थित होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, सुनील गोगटे, नितीन परमार, राजाभाऊ कोठारी, दिलीप गडकरी, विनायक उपाध्ये, पांडुरंग गरवारे, मुफद्दल डाभिया, रमाकांत जाधव, महेंद्र चंदन, धुळे, प्रभाकर गंगावणे, अरुण निघोजकर, ज्ञानेश्वर वाडीले, असीफ मिर्झा, कल्पेश शहा, चंद्रशेखर परदेशी, पंकज शाह, मिलिंद खंडागळे, शैलेश सातपुते आदिं सह देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोसरी येथील शिवतीर्थ येथे उपविभागीय कार्यालयात उपविभागीय प्रकाश संकपाळ, जीवन शिक्षण मंदिर व जनता विद्या मंदिर दहिवली येथे माजी आमदार सुरेश लाड, गीता घारे इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये संस्थेचे अध्यक्ष सुधाकर घारे, नगरपरिषदे मध्ये मुख्याधिकारी वैभव गारवे, तहसील कार्यालयात तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, उपविभागीय कार्यालयात उपविभागीय प्रकाश संकपाळ, पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी. टेळे, पंचायत समिती मध्ये गट विकास अधिकारी चंद्रकांत साबळे, कोंकण ज्ञानपीठ कर्जत महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोंधळी, अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान, फार्मसी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. मोहन काळे, माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान संस्थेत खजिनदार विजय मांडे, कोंदिवडे ग्रामपंचायती मध्ये सरपंच प्रमोद देशमुख, खांडपे ग्रामपंचायतीमध्ये सरपंच नमिता घारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड,माजी उपसभापती मनोहर थोरवे, विजय पाटील, संभाजी जगताप, शिवराम बदे , प्रसाद थोरवे , संकेत भासे, अभिषेक सुर्वे, विश्वनाथ थोरवे, दिनेश कडू, तात्या रुठे, अवसरमल, ज्ञानेश्वर कर्णुक आदी उपस्थित होत.

## उरण तालुक्यात स्वातंत्र्य दिन साजरा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात भारतीय स्वातंत्र्याचा ७८वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

उरण तहसिल कार्यालया समोर उरणचे तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांच्या हस्ते तर उरण पोलिसांच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या हस्ते भारतीय तिरंग्याला पोलिसांच्या शासकीय सलामीने मानवंदना देण्यात आली. तर उरण पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी ध्वजारोहण केले असून उरण नगरपरिषद कार्यालय येथे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या हस्ते तिरंगा फडकविण्यात आला.

उरण तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या मोरा पोलिस ठाणे, न्हावाशेवा पोलिस ठाणे, जासई पोलिस दूरक्षेत्र व चिरनेर पोलिस दूरक्षेत्र येथे संबंधित पोलिस अधिकारी यांनी झेंडा वंदन केले तसेच उरण



तालुक्यातील प्रार्थमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालयांसह ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींसह ग्रामस्थ व महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

## पेण तालुक्यात स्वातंत्र्य दिन

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापन दिन पेण तालुक्यात उत्साहात साजरा करण्यात आला यानिमित्त प्रांत कार्यालयात प्रांताधिकारी प्रविण पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम झाला या वेळी पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

या वेळी ठिकठिकाणी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमात आमदार रविशेठ पाटील, तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसिलदार नितीन परदेशी, मा. नगराध्यक्षा प्रितम पाटील, वैकुंठ पाटील, ॲड. मंगेश नेने, अनिरुध्द पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वनअधिकारी कुलदीप पाटकर, एसटी जिल्हा विभाग नियंत्रक दीपक घोडे, बापूसाहेब नेने, मा. उपनगराध्यक्षा वैशाली कडू, अरविंद वनगे, मिलिंद पाटील, रशाद मुजावर आदींसह मान्यवर उपस्थित होते.

नगरपरिषदमध्ये ध्वजारोहण कार्यक्रमात नगरपरिषद शाळा क्र.८ च्या विदयार्थ्यांनी स्त्री अत्याचार व क्रिकेट वर्ल्डकप विजेता भारत या वर आधारित नृत्य सादर करीत उपस्थितांची वाहवा मिळविली.



## पोलादपूर येथे सत्कार



पोलादपूर : प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त पोलादपूर शहर तसेच तालुक्यात विविध संस्था, शाळा व सरकारी कार्यालयांमध्ये ध्वजारोहण झाल्यानंतर पोलादपूर तहसिल कार्यालयाच्या प्रांगणामध्ये सामुदायिक ध्वजवंदन करण्यात आले. यानंतर तहसिलदार कपिल घोरपडे यांनी विविध क्षेत्रातील नागरिकांचा सत्कार केला. या वेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अनिल जाधव हेदेखील उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यातील माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायती, सरकारी दवाखाने, पंचायत समिती, नगरपंचायत तसेच विविध खात्यांची सरकारी कार्यालये येथे स्वातंत्र्यदिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त संबंधित प्रमुखांकडून ध्वजारोहण होऊन ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी तालुक्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिकांचा सत्कार तहसिल कार्यालयातील तहसिलदार यांच्या दालनामध्ये तहसिलदार कपिल घोरपडे यांच्याहस्ते करण्यात आला.

यामध्ये स्वातंत्र्यसैनिकांच्या विधवा पत्नी, माजी सैनिक, माजी लोकप्रतिनिधी, विविध विभागाचे कर्तव्यदक्ष अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व तरूण पत्रकार तसेच एनसीसी कॅडेट विद्यार्थी यांचा समावेश होता.

## संजय राणे यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**




भारत सरकारकडून गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल मुंबई संरक्षण विभाग पोलीस उपनिरीक्षक संजय राणे यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे.

संजय राणे हे बृहन्मुंबई पोलीस दलात केलेली एकूण ३७ वर्षे निष्कलंक आणि निस्वार्थ सेवा देत आहेत. याच सेवेची दखल घेत त्यांना भारत सरकारच्या वतीने गौरविण्यात येणार आहे. या बद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## नवी मुंबई महापालिका मुख्यालयात ध्वजारोहण

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयकॉनिक वास्तू म्हणून नावाजल्या जाणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या प्रांगणात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले.



**पनवेल : स्वातंत्र्यदिनानिमित्ताने हुतात्मा स्मारक येथे थोर स्वातंत्र्य सैनिकांचे उत्तराधिकारी यतीन ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी आयुक्त श्री. मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, तहसीलदार विजय पाटील महापालिका अधिकारी-कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे उत्तराधिकारी, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.**




**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या कोपर येथील शाळेत गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

## आमदार रविशेठ पाटील यांचे वाढदिवस अभीष्टचिंतन

**पेण : प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन व पेणमध्ये आमदार रविशेठ पाटील याचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून व फोनवरून शुभेच्छा दिल्या.

सकाळपासूनच आमदार रविशेठ पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी वैकुंठ निवासस्थानी कार्यकर्त्यांची रीघ लागली होती. यावेळी प्रांताधिकारी प्रविण पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पेण न.प. मुख्याधिकारी जीवन



पाटील, लेखाधिकारी किरण शहा, आबासाहेब मनाळ, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, भरत निंबरे, रमेश देशमुख, तहसिलदार तानाजी शेजाळ, पेणचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, वडखळ ग्रा. सदस्य योगेश पाटील, भाजप कामगार मोर्चाचे उपाध्यक्ष विनोद शहा, जनार्दन जाधव, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश कदम तसेच मंत्रिमंडळातील सहकार्यांनी फोनवरून व इतर मान्यवरांनी या वेळी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, आमदार रविशेठ पाटील यांना दूरध्वनीद्वारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकासमंत्री विजयकुमार गावित आदीं सहकाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

## भव्य दिव्य तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा जागर

भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, पनवेल शहर महिला मोर्चाच्या अध्यक्ष राजेश्री वावेकर, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, अभिमन्यू पाटील, अजय बहिरा, मनोहर म्हात्रे, अमर पाटील, शत्रुघ्न काकडे, तेजस कांडपिळे, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, संजना कदम, नेत्रा पाटील, अनिता पाटील, नीता माळी, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, अमित ओझे, समीर कदम, ॲड. आशा भगत, अमर उपाध्याय, भाऊ भगत, प्रदीप भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, खारघर सरचिटणीस दिपक शिंदे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, मयुरेश खिस्मतराव, अभिषेक भोपी, प्रवीण बेरा, बिना गोगरी, गीता चौधरी, सपना पाटील, साधना पवार, सुहासिनी केकाणे, संध्या शारबिद्रे, विपुल चौटालिया, ॲड. राजेंद्र अग्रवाल, संतोष शर्मा, यांच्यासह सायकलपटू, हजारो नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा सहभाग होता. अत्यंत शिस्तबद्ध झालेल्या या तिरंगा रॅलीने संपूर्ण रायगड आणि नवी मुंबईचे लक्ष वेधून घेतले.

## देशाला सेक्युलर सिव्हिल कोडची गरज -पंतप्रधान

देशात धर्माच्या आधारावर जो भेदभाव केला जातोय, सामान्य नागरिकांना जो दुरावा जाणवतो, त्यापासून आपल्याला यामुळे मुक्ती मिळेल, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

त्यांनी पुढे एक देश एक निवडणूक धोरणाचाही पुनरुच्चार केला. देशात आता एक देश एक निवडणूक धोरण राबवणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले, तसेच राजकारणातील घराणेशाही नष्ट करणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. देशभरातून कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसेलेल्या एक लाख तरुण-तरुणींना पुढे यावे आणि राजकारणात सक्रीय व्हावे. त्यांनी कोणत्याही पक्षात जावे पण राजकारणात यावे, असे आवाहन मोदी यांनी केले.

# मासळी निर्यातदार कंपन्या आता करंजा मच्छीमार बंदरातच येतील

## आमदार महेश बालदी यांचे प्रतिपादन

उरण : वार्ताहर

यापुढे मच्छीमारांना मासळी निर्यात करण्यासाठी निर्यातदारांकडे जाण्याची गरज नाही तर निर्यातदार कंपन्यांनाच मासळी खरेदीसाठी करंजा मच्छीमार बंदरात येतील. राज्यातील एक छानदार १५० कोटी खर्चाच्या करंजा मच्छीमार बंदराची निर्मिती झाली आहे. मासळीच्या खरेदी-विक्रीच्या बाजारालाही प्रारंभ झाला आहे. त्यामुळे यापुढे मच्छीमारांना मासळी निर्यात करण्यासाठी निर्यातदारांकडे जाण्याची गरज नाही तर निर्यातदार कंपन्यांनाच मासळी खरेदीसाठी करंजा मच्छीमार बंदरात यावे लागणार असल्याचे मत उरणचे आमदार महेश बालदी यांनी गुरुवारी (दि. १५) करंजा येथील आयोजित कार्यक्रमातुन व्यक्त केले.



करंजा मच्छीमार बंदरात मासळी खरेदी-विक्री करण्यासाठी स्थानिक मच्छीमारांसाठी द्रोणागिरी मासळी मार्केट सुरू करण्यात आले आहे. नव्याने सुरू करण्यात आलेल्या या मासळी मार्केटचे उद्घाटन १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून उरणचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात झाले. या वेळी बोलताना आमदार महेश बालदी यांनी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून १५० कोटी खर्च करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून करंजा मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. या आधुनिक बंदराचा फायदा परिसरातील हजारो मच्छीमारांना होणार आहे. त्यामुळे यापुढे मच्छीमारांना मासळी निर्यात करण्यासाठी निर्यातदारांकडे जाण्याची गरज नाही तर निर्यातदार कंपन्यांनाच मासळी खरेदीसाठी करंजा मच्छीमार बंदरात यावे लागणार असल्याचे मत उरणचे आमदार महेश बालदी यांनी या वेळी व्यक्त केले. बंदरातील दुसऱ्या टप्प्यातील उर्वरित प्रलंबित कामांसाठी आवश्यक असणारा १५४ कोटी निधी लवकरच उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्याआधी मच्छीमारांना आवश्यक असणारे शेड येत्या महिन्याभरात उभारण्यात येईल, असे आश्वासनही आमदार महेश बालदी यांनी मच्छीमारांना दिले.

करंजा मच्छीमार बंदरातील लोकल मार्केटमधुन केरळ, कर्नाटक, दिल्ली, हिमाचल प्रदेश, ओरिसा, गोवा आदी राज्यात मासळीला मोठी मागणी आहे. परदेशात निर्यात होणाऱ्या मासळी पेक्षाही लोकल मार्केटमध्ये पाठविण्यात येणाऱ्या बांगड्या, कुपा, शिंगाला, सुरमई, काटबांगडा, तांब आदी मासळीला अधिक भाव मिळत आहे. यामुळे मच्छीमारांना एक प्रकारे दिलासा मिळत असल्याचे करंजा मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी सांगितले. तर आधुनिक करंजा मच्छीमार बंदर हे हजारो मच्छीमारांसाठी हब ठरले आहे. मच्छीमारांसाठी मासळीची चढउतार व खरेदी-विक्रीसाठी २४ तास बंदर खुले आहे. बंदरामुळे २० ते २५ हजार रोजगार उपलब्ध झाला आहे. अनेक निर्यातदार कंपन्या मासळी खरेदी विक्रीसाठी बंदरात येऊन लागल्या आहेत. याचा निश्चितपणे फायदा मच्छीमारांना होऊ लागला असल्याच्या भावना पर्ससीन नेट फिशिंग असोसिएशनचे अध्यक्ष गणेश नाखवा यांनी व्यक्त केली.

या वेळी करंजा मच्छिमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, पर्ससीन नेट फिशिंग असोसिएशनचे अध्यक्ष गणेश नाखवा, माजी चेअरमन विलास नाखवा, माजी चेअरमन नारायण नाखवा, माजी चेअरमन शिवदास नाखवा, माजी चेअरमन कृष्णा कोळी, सोसायटी सदस्य राजेश नाखवा, माजी व्हाईस चेअरमन रमेश नाखवा, नगर परिषद माजी उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, करंजा गावातील मच्छिमार, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्यांचे स्मरण केले पाहिजे -आमदार प्रशांत ठाकूर

कामोठे : रामप्रहर वृत्त

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी ज्यांनी बलिदान दिले त्यांचे स्मरण आपण करत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठ्यात स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमावेळी केले. देशाच्या ७८व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये स्कूल कमिटीचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, प्रदीप भगत, ॲड. आशा भगत, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अविनाश कुलकर्णी, रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, स्कूल कमिटी सदस्य राजेश गायकवाड, संतोष गुजर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शाळेतील शिक्षण पुर्ण झाल्यावरही नंतरही शाळा आणि शाळेचे मॅनेजमेंट पालकांना सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिली. यासोबतच सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.



स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून (एलआरटीपीएस-कनेक्ट) ई-मॅक्झिनचे उद्घाटनही या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. विविध शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ह्याच वेळी भारतभूमी बद्दलचे गुणगान विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यातून व्यक्त केले. शाळेच्या पर्यवेक्षिका रुहल दुबे व अर्चना माथुर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन



पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या प्रांगणात स्कूल चेअरमन भार्गव ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय टी देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, वसंत पाटील, विजय घरत, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, शाळेचे प्राचार्य नीरज शर्मा, वामन म्हात्रे, साईचरण म्हात्रे, माई भोईर, योगिता भगत, जयश्री घरत, इंदुमती म्हात्रे, आनंदी घरत, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,पालक आणि विद्यार्थीगण आदी उपस्थित होते.

या वेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे तसेच नृत्यअविष्कारांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तांच्या वेशभूषामध्ये उपस्थित राहून या अभियानात उत्साहवर्धक उपस्थिती दर्शवली.

## गव्हाण विद्यालयात झेंडावंदन

पनवेल : रामप्रहर वृत्त

७८ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या दोन्ही विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा थोर देणगीदार आदरणीय लोकनेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत तसेच रयत शिक्षण संस्थेचे उच्च शिक्षण समिती व जनरल बॉडी सदस्य कामगार नेते महेंद्र घरत व अन्य विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी तसेच मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, पंचक्रोशीतील सर्व विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच गव्हाण विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या प्रणिता गोळे, गव्हाण विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आदी उपस्थित होते.



## तक्का येथील मराठी प्रायमरी स्कूलमध्ये विविध कार्यक्रम



पनवेल : रामप्रहर वृत्त

तक्का येथील मराठी प्रायमरी स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. या वेळी प्रतिमापूजन, ध्वजपूजन असे विविध कार्यक्रम झाले.

या कार्यक्रमाला भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष आणि उपाध्यक्ष शालेय कमिटी रावसाहेब खरात, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष राम तेकम, प्रमुख पाहुणे शुभम फार्माचे प्रो. पा. दिलीप सिंघवी, दिलीप पालकर, सेवानिवृत्त शाखा व्यवस्थापक रायगड जिल्हा बँक मदनलाल चपलोत, बसंती जैन, महेश साळुंखे, राजू झिरे, सुनील सुर्वे आयोजक मुख्याध्यापक प्रवीण शिलवंत, अंकिता पिंगळे, देवव्रत चाफेसर, सुनिल पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक प्रवीण शिलवंत यांनी मानले आणि कार्यक्रमाची सांगता केली.

## विचुंबे येथील सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्याचे उद्घाटन



पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल तालुक्यातील विचुंबे ते श्री ज्ञानेश्वर माऊली सोसायटीपर्यंतच्या सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्याचे उद्घाटन स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

विचुंबे ते श्री ज्ञानेश्वर माऊली सोसायटीपर्यंतचा सिमेंट काँक्रीटीकरण केलेला हा रस्ता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून व विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या पाठपुराव्यातून झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्याचे काम करण्यात आले.

या रस्त्याच्या उद्घाटनावेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, माजी उपसरपंच रवींद्र भोईर, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, माजी सरपंच बळीराम पाटील, राम म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अनिल भोईर, बि. डी. पाटील, गाव अध्यक्ष के. सी. पाटील, अनंता गायकवाड, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, विभूती सुरते, प्रगती गोंधळी, माजी सदस्य प्रमिला म्हात्रे, भाग्यश्री भोईर, अक्षता गायकवाड, ज्योती भोईर, हर्षदा भिंगारकर, अविनाश गायकवाड,



डि. के. भोईर, चेतन सुरते, आनंद गोंधळी, श्याम म्हात्रे, जगदीश भोईर, विवेक भोईर, संजीत भिंगारकर, राकेश मोरे, विनोद सावंत, बबन जाधव, गणेश सावंत, अजय जाधव आणि श्री ज्ञानेश्वर माऊली सोसायटीमधील सर्व रहिवासी उपस्थित होते.

## क्रीडा संकुलात ध्वजारोहण

पनवेल : रामप्रहर वृत्त

देशाचा ७८वा स्वातंत्र्यदिन गुरुवारी देशभक्तीपर वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त पनवेल येथील तालुका क्रीडा संकुलात पनवेलचे प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहण समारंभाला आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. या वेळी जिल्हा विकास योजना आणि क्रिडांगण विकास अनुदान योजनेंतर्गत क्रिडा साहित्याचे वाटप आणि महसुल पंधरवड्यानिमित्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आमदारांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.





दरम्यान, क्रिडा सुंकलात विविध औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या शरीराला निरोगी ठेवण्यासाठी आणि आरोग्यवर्धक रानमेवा जपण्यासाठी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेअंतर्गत आयोजीत करण्यात आलेल्या तालुकास्तरीय रानभाजी महोत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमांवेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, नायब तहसीलदार डॉ. सुनील जाधव, संजय भालेराव, संभाजी शेलार, राजश्री जोगी, सुभाष राठोड, गोविंद सगर, आशा पाटील, शशिकांत सानप, प्रेमदास राठोड, संजय बिक्कड, भालचंद्र ढवळे, प्रिया वैती आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# धर्मनिरपेक्ष कायद्यांची गरज

देशात कम्युनल कोड नव्हे तर सेक्युलर सिव्हिल कोड असायला हवे असे अत्यंत महत्त्वाचे नि:संदिग्ध विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी स्वातंत्र्यदिनी लालकिल्ल्यावरून तिरंगा फडकवताना केले. आपल्या संविधानाच्या निर्मात्यांनी अशा धर्मनिरपेक्ष सिव्हिल कोडचेच स्वप्न पाहिले होते याची आठवणही मोदींनी यावेळी करून दिली

**देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने याआधी अनेकवेळा समान नागरी कायद्यावर चर्चा केली आहे. अनेक वेळा यासंदर्भात आदेशही दिला आहे याचा उल्लेख करीत, गेली ७५ वर्षे आपण ज्या नागरी कायद्याला घेऊन जगलो आहोत, तो एकप्रकारे जातियवादी (कम्युनल) कायदा आहे. लोकांमध्ये धर्माच्या आधारे भेदभाव करणारा हा कायदा दूर व्हावा हे आपल्या संविधान निर्मात्यांचेच स्वप्न होते. म्हणूनच ते आपल्याला पूर्ण केले पाहिजे असे विधान करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समान नागरी कायद्याचा मुद्दा लालकिल्ल्यावरील आपल्या भाषणातून देशासमोर ठेवला. जे कायदे धर्माच्या आधारावर देशाची विभागणी करतात, जे कायदे उच्च-नीचतेचे कारण बनतात अशा कायद्यांना आधुनिक समाजात कोणतेही स्थान नाही. म्हणूनच देशात एक सेक्युलर सिव्हिल कोड असावे अशी देशाची मागणी आहे, परंतु या विषयावर राजकीय मतैक्य कधीच झालेले नाही याकडे लक्ष वेधत मोदींनी या गंभीर विषयावर चर्चा व्हायला हवी असे आवाहन केले, परंतु विरोधासाठी विरोध करण्याचाच अजेंडा राबवणाऱ्या विरोधकांनी मोदींच्या चर्चेच्या आवाहनालाही लागलीच नकारात्मक भूमिकेनेच प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. सध्याच्या कायद्यांचा मोदींनी केलेला 'कम्युनल' अर्थात जातियवादी असा उल्लेख विशेषत: काँग्रेस पक्षाला रुचलेला दिसत नाही. चर्चेच्या आवाहनालाही कडवट टीकेने उत्तर देत काँग्रेस पक्षाने प्रत्येक मुद्यावरून निव्वळ विरोधाचे राजकारण करण्याचे आपले धोरणच पुढे रेटले. या अशा वृत्तीचाच उल्लेख मोदींनी आपल्या भाषणात, दुष्ट हेतू बाळगणाऱ्यांना आपण सद्हेतूने उत्तर देऊ असा केला. भाषणात मोदींनी देशासमोर असलेल्या अंतर्गत तसेच बाह्य आव्हानांचा आढावा घेतला. काही निराशावाद्यांमधील विकृती देशात विनाश घडून यावा अशी स्वप्ने पाहते आहे. देशाला अशा प्रवृत्तींना समज द्यावी लागेल. तसेच जागतिक स्तरावरही कुणाला भारताचा विकास हे संकट वाटण्याची गरज नाही. या अशा प्रवृत्तींनी संकटे निर्माण करणाऱ्यांशी हातमिळवणी केल्यास भारताला प्रगतीच्या वाटेवर पुढे जात राहण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल, पण असे दुष्ट हेतू बाळगणाऱ्यांना आम्ही सद्हेतूंनी जिंकू असा दुर्दम्य आत्मविश्वासही मोदींनी व्यक्त केला. देशातील तरुणांना वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जावे लागते याचा उल्लेख करीत, याची गरजच भासू नये याकरिता येत्या पाच वर्षांत देशातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ७५ हजार नव्या जागा निर्माण केल्या जातील अशी घोषणा मोदींनी केली. जागतिक स्तरावर अनेक देशांमध्ये सध्या दिसणारी अस्थिर परिस्थिती लक्षात घेता ही घोषणा वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्या व त्यासाठी लाखो रूपये खर्च करणाऱ्या असंख्य तरुणांसाठी व त्यांच्या पालकांसाठीही मोठा दिलासा देणारी ठरावी. मोदी सरकारने सुरूवातीपासूनच तरुणांच्या कौशल्यविकासावर भर दिला आहे. देशातील तरुणांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आपल्या देशातच मिळाले पाहिजे याकडे आपले सरकार विशेष लक्ष देईल असे आश्वासन मोदींनी दिले. बांगलादेशातील परिस्थितीबद्दल विशेषत: तेथील हिंदूंच्या सुरक्षिततेबद्दल मोदींनी चिंता व्यक्त केली व तेथे लवकरात लवकर शांतता प्रस्थापित होईल अशी आशाही व्यक्त केली.**

# गणेशमूर्ती कारखानदारांनी काळाची पावले ओळखावीत





**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

पेण तालुक्यातील हमरापूर येथील गणेशमूर्ती व्यवसायाला आता समूह विकासाची जोड मिळणार आहे. केंद्र सरकारच्या सूक्ष्म आणि लघू समूह विकास कार्यक्रमांर्तगत केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या मदतीने हा उपक्रम राबविला जाणार आहे. यासाठी श्री मोरया गणपती आयडॉल फाऊंडेशन या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. जागा निश्चितीही झाली आहे. साडेचार कोटीचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला असून तो मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी कंपनीमधील भागीदारांनी १० टक्के निधी उभारायचा आहे, तर उर्वरीत ९० टक्के निधी केंद्र आणि राज्य सरकार देणार आहे.

हमरापूर गावात अशाप्रकारचे सुविधा केंद्र सुरू झाल्यास यातून गावातील गणेश व्यवसायाशी संबंधीत लहान कारागिरांनाही उद्योगवाढीसाठी मदत होईल. यापूर्वी पेण येथे अस प्रकल्प सुरू करण्याचा प्रयत्न झाला होता, परंतु कारखानदार एकत्र न येऊ शकल्यामुळे हा प्रकल्प रखडला होता. हमरापूरचा समूह विकास प्रकल्प यशस्वी होईल, अशी अपेक्षा करूया. यासाठी गणेशमूर्ती कारखानदारांनी काळाची पावले ओळखून राज्य सरकारला सहकार्य करायला हवे.

यापूर्वी पेणमध्ये समूह विकास प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न झाला होता. साधन सामुग्रीचा अभाव आणि तंत्रज्ञानाच्या कमतरतेमुळे पेणमधील गणेशमूर्ती व्यवसायाला गतिमानता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कोट्यवधींची उलाढाल होत असली तरी हा व्यवसाय कुटीर उद्योग म्हणूनच ओळखला जात आहे. ही बाब लक्षात घेऊन पेणमधील गणेशमूर्ती व्यवसायाला समूह विकास योजनेतून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मूर्तीकारांना यासाठीचे प्राथमिक प्रक्षिक्षणही देण्यात आले होते, परंतु ही योजना बारगळली. आता गणेशमूर्ती कराखान्यांच्या समूह विकासाचा प्रयोग हमरापूर परिसारात केला जाता आहे.

पूर्वी पेण शहारात गणेशमूर्ती बनविणारे कारखाने होते. या कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी आसपासच्या गावांमधून कारागिर येत असत. पुढे या कारागिरांनी आपल्या गावांमध्ये कारखाने सुरू केले. त्यामुळे आता हा व्यवसाय संपूर्ण पेण तालुक्यात होतो. पेण तालुक्यातील जोहे, हमरापूर परिसरात १३ गावांध्ये गणेशमूर्ती बनवणाऱ्या ३५०हून अधिक कार्यशाळा आहेत. येथे वर्षभर गणेशमूर्ती बनविण्याचे काम सुरू असते. हजारो कारागीर येथे काम करीत असतात. अनेकांना यामुळे रोजगार मिळतो. या परिसारातून दरवर्षी जवळपास २० लाख गणेशमूर्ती तयार केल्या जातात. ज्या देशविदेशात पाठवल्या जातात. या मूर्तीकला व्यवसायातून दरवर्षी साधारणपणे ५० कोटींची उलाढाल होत असते. या भागातील गणेशमूर्ती व्यवसायाचे स्वरूप विस्कळीत आहे. त्यामुळे आवश्यक असणाऱ्या सुविधा त्यांना मिळत नाहीत. या कारखानदारांना एकत्र आणून त्यांना चांगल्या सुविधा निर्माण करून देणे ही काळाची गरज आहे.

गणेशमूर्ती तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल परराज्यांतून आणावा लागतो. समूह विकास प्रकल्पात हमरापूर येथे कच्चा माल साठवण केंद्रांची उभारणी केली जाईल. त्याचबरोबर मूर्तिकारांना प्रशिक्षण देण्यासाठी एका प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली जाईल. सामुहिक प्रोसेसिंग युनिटची निर्मिती करून त्यात इंजेक्शन मोल्डींग आणि फ्लोरोसंट कलरींग मशिन्स परदेशातून आणून या ठिकाणी बसवून घेतल्या जातील. यांत्रिकीकरणामुळे व्यवसायाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. गुणवत्ता वाढीस मदत होणार आहे. वेळेची बचत होण्यास मदत होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन गणेशमूर्ती कारखानदारांनी हा समूह विकास प्रकल्प यशस्वी केला पाहिजे ती काळाची गरज आहे.

पेण शहरात व आसपासच्या परिसरात तयार होणाऱ्या गणेशमूर्तींसाठी लागणारा कच्चा माल हा बहुतांश गुजरातमधून आणला जातो. आता गुजरात सरकारने त्यांच्याच राज्यात गणेशमूर्ती व्यवसायाला चालना देण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. पेणमधील मूर्तीकारांना गुजरातमध्ये बोलवून कुंभारकाम आणि मातीकाम करणाऱ्यांना गणेशमूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले जात आहेत. पेणमधील गणेशमूर्ती व्यावसायिकांसाठी ही धोक्याची घंटा आहे कारण मूर्ती कामासाठी लागणारा कच्चा माल गुजरातमध्ये सहज आणि किफायतशीर दरात उपलब्ध होणार असल्याने जर त्यांनीच या मूर्ती बनवण्यास सुरुवात केली तर विस्कळीत स्वरुपात पेणचा गणेशमूर्ती व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि गोवा या राज्यात गणेशमूर्तींना मोठी मागणी असते. त्यामुळे गुजरातमधून किफायशीर दरात मूर्ती बनवून पाठवणे त्यांना सहज शक्य होणार आहे. गुजरात सरकारने जर या व्यवसायाला उद्योगाचे स्वरुप देऊन आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली, तर गणेशमूर्ती कलेची परंपरा असणाऱ्या पेणमधील व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. हा धोका ओळखून पावले उचलली पाहिजेत. हमरापूचा गणेशमूर्ती कारखन्यांचा समूह विकास प्रकल्प पूर्णत्ववास नेण्यासाठी प्रयत्न व्हायाला हवेत. मूर्तीकारांनी काळानुसार व्यवसायात बदल करायला हवेत. विस्कळीत व्यवसायाला संघटीत स्वरुप द्यायला हवे. त्याचबरोबर कलेला तंत्रज्ञानाची जोड द्यायला हवी नाही तर स्पर्धेच्या युगात छोट्या कारखानदारांचा निभाव लागणे कठीण आहे.

मूर्ती सुबक असल्यामुळे पेण व आसपासच्या परिसारातील गणेशमूर्तींना मागणी असते, परंतु भविष्यात पेणच्या या व्यवसायाला गुजरातचे आव्हान असू शकते. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सज्ज असायला हवे. महाराष्ट्र सरकारनेदेखील गणेशमूर्ती कारखाना व्यवसायाला उद्योगाचे स्वरुप दिले पाहिजे. महराष्ट्र सरकार तसे प्रयत्न करतणार असेल तर गणेशमूर्तीकारांनीदेखील सरकारला साथ दिली पाहिजे. रायगड जिल्हा प्रशासनाने आता हमारपूर परिसारातील गणेशमूर्ती कारखानदारांसाठी समूह विकास प्रकल्प राबविण्यसाठी पुढकार घेतला आहे. समूह विकास प्रकल्पासाठी सर्वांत मोठी अडचण असते ती त्यांनी एकत्र येऊन कंपनीची स्थापना करण्याची ती दूर झाली आहे.

हमरापूर जोहे परिसरातील साडेतीनशेहून अधिक गणेश मूर्तीकार व्यावसायिक एकत्र आले आहेत, ही एक चांगली बाब आहे. अजून बराच पल्ला गाठायचा आहे. पेणमधील अनुभव लक्षात घेऊन काही सुधारणा करायला हाव्यात. गणेशमूर्ती कारखानदारांनी सहकार्य केल्याशिवाय हमरापूरचा समूह विकासाचा प्रकल्प यशस्वी होणार नाही.



## बदलते तंत्रज्ञान

### पासवर्ड विसरलात अन् फोन झाला लॉक? चिंता सोडा!

सुरुवातीला फोनमध्ये पासवर्ड सेट करण्याच्या फीचरचा पाहिजे तितका वापर केला जात नव्हता, पण आता मोबाईल, गॅलरी, विविध अॅप अनलॉक करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला जातो. जसे की, पासवर्ड, पिन, टच आयडी, फेस आयडी, फिंगरप्रिंट सेन्सर इत्यादी, पण तुम्ही कधी असा विचार केला आहे का की एखादा फोन तुमच्या हृदयाच्या ठोक्यांनी अनलॉक होईल? तर आता पल कंपनी त्यांच्या डिव्हाइसेससाठी या नवीन बायोमेट्रिक फीचरची चाचणी करीत आहे. म्हणजेच अॅपल कंपनीच्या आयफोन व मॅक अनलॉक करण्यासाठी तुम्ही तुमच्या हृदयाचे ठोके वापरू शकणार आहात.




अॅपल त्यांच्या आयफोन, आयपॅड आणि मॅकसह त्याच्या उपकरणांसाठी इलेक्ट्रोकार्डियोग्राम बायोमेट्रिक फीचरवर काम करत आहे. हे फीचर तुमच्या हृदयाच्या ठोक्यांवर आधारित असेल आणि तुमच्या हृदयाची ठोके जुळल्यावर तुमचे डिव्हाइस अनलॉक करेल.

प्रत्येक व्यक्तीच्या हृदयाचा ठोक्याचा ताल फिंगरप्रिंट किंवा बायोमेट्रिक सेन्सरप्रमाणेच अनोखा असतो. अॅपल वॉचवर ईसीजी अॅप वापरून अॅपल हृदयाच्या ठोक्यांवर लक्ष ठेवू शकते आणि युजर्सचे आयडेंटिफिकेशनचा एक प्रकार म्हणून त्याचा वापर करू शकते.

जेव्हा तुम्ही तुमचे अॅपल वॉच तुमच्या आयफोन किंवा इतर अॅपल उपकरणांशी जोडता तेव्हा हे नवीन तंत्रज्ञान काम करेल. अॅपल वॉच घातलेले वापरकर्ते ईसीजी अॅपद्वारे त्यांच्या हृदयाच्या ठोके वापरून त्यांचे डिव्हाइस अनलॉक करण्यास सक्षम असतील.

हे नवीन तंत्रज्ञान आयफोन, आयपॅड आणि मॅक युजर्ससाठी सुरक्षा म्हणून आणखी एक पर्याय ऑफर करते आहे. फेस अनलॉक, फिंगरप्रिंट आणि पासवर्ड व्यतिरिक्त, वापरकर्ते त्यांच्या हृदयाचे ठोके वापरून त्यांचे डिव्हाइस अनलॉक करू शकतात, मात्र हे तंत्रज्ञान व्यावसायिकदृष्ट्या कधी उपलब्ध होणार याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध अद्याप तरी समोर आलेली नाही. त्यामुळे सहजपणे फोन अनलॉक होत नसल्यास यासाठी तज्ज्ञांची मदत घेणे केव्हाही चांगले.

# माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी



**निमित्त**

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म २५ डिसेंबर १९२४ रोजी ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचा आज स्मृतिदिन. यानिमित्ताने जाणून घेऊ त्यांच्याविषयी...

ग्वाल्हेरच्या व्हिक्टोरिया कॉलेजमधून हिंदी, इंग्रजी आणि संस्कृतमध्ये बीए करण्यापूर्वी वाजपेयी यांनी तेथीलच सरस्वती शिशु मंदिरात शिक्षण घेतले, तर कानपूरच्या डीएव्ही कॉलेजमधून राज्यशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले. उत्कृष्ट वक्ते म्हणून, एक राजकारणी म्हणून त्यांचे कौतुक केले गेले.

वाजपेयींनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीला स्वातंत्र्यसैनिक म्हणून सुरुवात केली. १९४२च्या भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून राजकारणाशी त्यांचा पहिला सहभाग होता. विद्यार्थी असताना वाजपेयी यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीने आकर्षित केले. १९३०मध्ये ते स्वयंसेवक बनले. १९४७मध्ये वाजपेयींनी दीनदयाल उपाध्याय - राष्ट्रधर्म (एक हिंदी मासिक), पांचजन्य (एक हिंदी साप्ताहिक) आणि स्वदेश आणि वीर अर्जुन या दैनिकांसाठी पत्रकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पुढे श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रभावाखाली वाजपेयींनी १९५१मध्ये भारतीय जनसंघात प्रवेश केला.

निवडणुकीच्या राजकारणातील त्यांचा प्रवास १९५७मध्ये सुरू झाला, जेव्हा त्यांनी तीन जागांवर लोकसभा निवडणूक लढवली आणि उत्तर प्रदेशातील बलरामपूर मतदारसंघातून निवडून आले. वाजपेयींनी त्या वर्षी संसद सदस्य म्हणून शपथ घेतली आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना त्यांच्या उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्याने प्रभावित केले. वाजपेयी एक दिवस भारताचे पंतप्रधान होतील असे भाकीत नेहरूंनी केले होते.

दीनदयाल उपाध्याय यांच्या निधनानंतर १९६८मध्ये वाजपेयी यांना जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बनवण्यात आले. त्यानंतरच्या वर्षांमध्ये त्यांनी लालकृष्ण अडवाणी, नानाजी देशमुख आणि बलराज मधोक यांच्यासोबत भारतीय राजकारणात जनसंघाचे अस्तित्व अधिक ठळक करण्यासाठी काम केले.

जून १९७५मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी लागू केली तेव्हा वाजपेयींनी काही महिने तुरुंगात घालवले. त्यांनी अडवाणी आणि भैरोसिंग शेखावत यांच्यासोबत १९८०मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. त्यांची पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४च्या निवडणुकीत भाजपला ५४५ सदस्यांच्या लोकसभेत फक्त दोन जागा जिंकता आल्या. या पराभवाचा वाजपेयींना विशेष फटका बसला. पक्षाच्या बांधणीसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. पुढील लोकसभा निवडणुकीत १९८९मध्ये भाजपने ८८ जागा जिंकल्या. वाजपेयी पाच दशकांहून अधिक काळ संसदेचे सदस्य होते. ते दहा वेळा लोकसभेवर आणि दोनदा राज्यसभेवर निवडून आले. त्यांनी तीन वेळा पंतप्रधानपद भूषवले.

२००९मध्ये वाजपेयींना पक्षाघाताचा झटका आला, ज्यामुळे त्यांचे बोलणे बिघडले. त्यांना स्मृतिभ्रंश आणि दीर्घकालीन मधुमेहाचा त्रासही होता. १६ ऑगस्ट २०१८ रोजी त्यांचे ९३व्या वर्षी निधन झाले.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : स्वातंत्र्य दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा अभियान राबविण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार मुरूडमध्ये समुद्रावरील टांगेवाल्यानेही गाडीवर तिरंगा लावून स्वातंत्र्य दिन साजरा केला.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### नियमित खजूर खाण्याचे आहेत विविध फायदे

सकाळची सुरुवात नेहमी पौष्टीक आहाराने करायला हवी. नाश्त्यामध्ये हेल्दी पदार्थ खाल्ल्याने आपल्याला लंचपर्यंत भूक लागत नाही. शिवाय आपण उलटसुलट पदार्थही खाणे टाळतो. काही जण सकाळच्या नाश्त्यामध्ये चहा- कॉफी आणि मसालेदार पदार्थ खातात, मात्र यामुळे पोटाचे विकार वाढू शकतात. याउपर जर पौष्टीक ड्रायफ्रुट्स खाऊन दिवसाची सुरुवात कराल तर नक्कीच फायदा होईल.



आहारतज्ज्ञ किरण कुकरेजा यांच्या मते, दिवसाची सुरुवात ड्रायफ्रुट्सने केल्याने आरोग्याला नक्कीच फायदा होईल. हेल्दी पदार्थाने दिवसाची सुरुवात न केल्यास ब्लोटिंग, गॅसेस, हेअर फॉल आणि आयर्नची कमतरता भासू शकते. यासाठी आपण खजूर खाऊ शकता.

आहारतज्ज्ञांच्या मते, शरीरात आयर्नची कमतरता भासल्यास आपण दोन भिजलेले खजूर खाऊ शकता. खजूरमध्ये आयर्नचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे शरीरात लोहाची कमतरता भासत नाही. यासह हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढते. ज्यामुळे नेमियाचा धोका टळतो.

खजूर शरीराला उर्जा मिळते. १०० ग्रॅम खजूरमधून २७७ कॅलरीज मिळतात. शिवाय यातून शरीराला पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॉपर, मॅगनीज, लोह ही खनिजं आणि ब हे जीवनसत्व मिळतं.

खजुरामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे पचनक्रिया सुधारते. खजूर खाल्ल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही. पोट भरपूर वेळ भरलेलं राहतं. वजन जर आटोक्यात ठेवायचं असेल तर, आपण खजूर खाऊ शकता.

खजुरामध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस असते. ज्याचा फायदा हाडांच्या आरोग्यासाठी पुरेपूर होतो. खजूर नियमित खाल्ल्याने हाडांच्या विकाराचा धोका टळतो.

खजुरातील क जीवनसत्वामुळे त्वचा चांगली राहाण्यास मदत होते. त्यात व्हिटॅमिन सी आढळते. ज्यामुळे स्किन टवटवीत आणि सुंदर दिसते.

अशा प्रकारे खजूर हे शारीरिक कमतरता भरून काढण्याबरोबरच इतरही चांगले परिणाम दर्शवतो. म्हणून डॉक्टरही दररोज खजूर खाण्यास सुचवतात. मग विचार कसला करता दररोज किमान दोन खजूर खाणे सुरू करा, जेणेकरून आरोग्यास वर्धक राहील.

# लाडकी बहीण योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी -ना. आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महीला आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. आतापर्यंत ४८ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत असून पुढील लाभ देण्याचे काम सुरू असल्याचे सांगत ही योजना यापुढे कायमस्वरूपी राबविणार असल्याचे महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना प्रमाणपत्र वाटपावेळी रोह्यतील जेष्ठ नागरिक सभागृहात महीला व बालकल्याण मंत्री तटकरे यांच्या



हस्ते करण्यात आले. या वेळी त्या बोलत होत्या.

या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, निर्मालाताई कुचीक, पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी उपानगराध्यक्ष महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, नायब तहसीलदार राजेश थोरे, शहर अध्यक्ष अमित उकडे, निवास पाटील, विशाल काळे, सुधीर भगत, प्राजक्ता चव्हाण, स्वरांजली शिर्के आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात चिमुकली मायरा कोतवाल, सानवी शेलार यांचे मनोगत झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयेश भोईर यांनी केले. या वेळी मोठ्या संख्येने शासकीय अधिकारी, कर्मचारी व मोठ्या प्रमाणात महीला उपस्थित होते.

# 'युवा प्रशिक्षण'चा लाभ घेऊन कार्यात कुशलता आणा -आमदार थोरवे



**चौक : प्रतिनिधी**

राज्य सरकार राबवित असलेल्या साऱ्या योजनांचा अभ्यास करून, आपले कौशल्य सिद्ध करा, आणि आपले कर्तव्य चोख पार पाडा, भविष्यात या योजनांचा फायदाच होणार आहे, असे आवाहन कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केले आहे.

खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी पंचायत समितीच्या सभागृहात मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना आदेश कार्यक्रम आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी आमदार थोरवे बोलत होते.

ते पुढे म्हणाले केंद्र आणि राज्य सरकारने युवा पिढीसाठी कल्याणकारी योजना आखल्या आहेत, आपल्या कडे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता असेल तरच आपण आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकतो. गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी या योजनेची तातडीने अंमलबजावणी केल्याने रायगड जिल्ह्यात असा पहिलाच रजु आदेश देण्याचा उपक्रम होत आहे.मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना मधून पंचायत समिती खालापूर येथे ९, ग्रामपंचायत कार्यालयात ३१, प्राथमिक आरोग्य केंद्र ४, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र १५ अशा नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी केले.

या वेळी स. गटविकास अधिकारी राजपूत, अभियंता चव्हाण, डॉ. गायकवाड, युवा तालुका प्रमुख रोहित विचारे, तालुका प्रमुख, संदेश पाटील, माजी उपसभापती निवृत्ती पिंगळे, महीला आघाडी रेश्मा आंग्रे, पंकज पाटील, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांच्यासह युवा प्रशिक्षण युवक, युवती उपस्थित होते. सूत्रसंचालन विस्तार अधिकारी महादेव शिंदे यांनी केले.



**रायगड : जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनी ध्वजारोहण जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते उत्साहात झाले. या वेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उपजिल्हाधिारी भारत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसीलदार विक्रम पाटील यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# रायगडात भाजपतर्फे संविधान वाटप उपक्रमाची सुरूवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात भाजपच्या वतीने जिल्ह्यात संविधान वाटप उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत अलिबाग येथे मुख्य प्रशासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. आदिती तटकरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी किशन जावळे यांना भारतीय संविधानाची प्रत देऊन या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. यानंतर पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्यासह प्रशासनातील वरिष्ट अधिकारी, पत्रकार यांना संविधानाची प्रत देण्यात आली.

यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस एड. महेश मोहीते, जिल्हा चिटणीस हेमंत दांडकर, परशुराम म्हात्रे, तालुका अध्यक्ष उदय काटे, सुनील दामले, राजेश पाटील आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी येत्या महिन्याभरात संविधानाच्या सुधारित अवृत्तीचे वितरण केले जाणार आहे. भाजपने सुरू केलेल्या या उपक्रमाचे आदिती तटकरे यांनी कौतूक केले.

येत्या महिन्याभरत रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात संविधान वाटपाचा उपक्रम राबविला जाणार असल्याचे भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहीते यांनी स्पष्ट केले.



# मुरूडमध्ये स्वातंत्र्य दिनी विविध कार्यक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

७८वा भारतीय स्वातंत्र्य दिन विविध कार्यक्रमांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत, शासकीय निमशासकीय कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम ठिकठिकाणी झाला.

मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्या प्रांगणात प्रशासक तथा मुख्याधिकारी -पंकज भुसे यांच्या शुभ हस्ते राजे शिवछत्रपती महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सकाळी ७.३० वाजता कार्यालया जवळील व ८.१५ वाजता आझाद चौका जवळील शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

मुख्याधिकारी -पंकज भुसे यांनी मुरुड च्या नागरिकांना स्वातंत्र्य दिनाचा शुभेच्छा देण्यात आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद देत सर्व नागरिकांनी आप आपल्या घरी घरी तिरंगा फडकावला.

या वेळी प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, राकेश पाटील, स्नेहा पाटील, मंगेश दांडेकर, मनोज पुलेकर,सतेज निमकर, प्रशांत दिवेकर, अविनाश दांडेकर, पांडुरंग आरेकर, प्रमोद भायदे, नरेंद्र नांदगांवकर,संदिप पाटील,विजय सुर्वे,आदेश दांडेकर, दिपाली दिवेकर,नौसिन दरोग, मसाल सर,दिप्ती एरंडे, स्वप्नजा विरुकुड दिपक शिंदे आदींसह शहरातील तमाम देशभक्त नागरिक उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-तोंढरे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीवे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे: तोंढरे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र | हिस्सा क्र | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार र.पै |
|---|---|---|---|---|---|
| तोंढरे | न्यू बॉम्बे ट्रीन सिटी को ऑप हौऊसिंग सोसायटी तर्फे श्री. न.ज. बिरदी चिफ प्रमोटर | ११ | १ | ०.५५.४०<br>०.०१.५०<br>०.५६.९० | ७.२५ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्बंध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १५/०८/२०२४**

**सही/-**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**

पत्ता- शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर-५, नवीन पनवेल, ४१०२०६



**पेण : सुधागड मतदार संघांचे कार्यसम्राट आमदार रविशेठ पाटील यांना वाढदिवसानिमित्त प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे नागोठणे येथील ज्येष्ठ कार्यकर्ते सिराज पानसरे, वासिम बोडेरे, रयान सिराज पानसरे, तलहा वासिम बोडेरे, मुजफ्फर कडवेकर, तात्या पोत्रिक आदींनी शुभेच्छा दिल्या.**



**अलिबाग : रायगड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

# उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शासकीय कर्मचारी, अधिकारी यांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

शासकीय सेवेत आणि महसूल पंधरवडा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान खालापूर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी केला.

खालापूर तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात भारतीय स्वातंत्र्याचा ७८वा वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण केले.



महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी,क़र्मचारी, कर्मचारी - अधिकारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी, उत्कृष्ठ कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन तहसीलदार जितेन्द्र इंगळे यांनी सत्कार केला, त्याच बरोबर महसूल पंधरवडा सांगता समारंभदेखील झाला. नायब तहसीलदार विकास पवार, निवडणुक नायब तहसीलदार दशरथ भोईर, मंडळ अधिकारी भरत सावंत, मंडळ अधिकारी संदेश पानसरे, अव्वल कारकून अशोक सुसलादे, लेखनिक सारंग राठोड, अविनाश गुरले, अमोल वाघ, तलाठी माधव कावरखे, मुगदण, कोतवाल रुपाली निधी यांचा सन्मान करण्यात आला.

# रोहा भाजपतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

## आमदार रविशेठ पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**धाटाव : प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेत मिळून मिसळून राहत गोरगरिबांचा शेठ ही उपाधी जनतेकडून प्राप्त झालेले आमदार रविशेठ पाटील यांचा वाढदिवस रोहा तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून रोहा भाजपतर्फे तब्बल ३५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व तिरंगा वाटप करण्यात आले.

बुधवारी (दि.१४ ) मेंढा हायस्कूल २०० विद्यार्थी, राजिप सुतार वाडी २५ विद्यार्थी, दुरटोळी २८ विद्यार्थी, राजिप शाळा मेंढा ४५ विद्यार्थी, राजिप शाळा वरसगाव येथील विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तर शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व तिरंगा वाटप करण्यात आले तेथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



साहित्य वाटप रायगड जिल्हा भाजप उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, तालुका सचिव अरुण वाघमारे, सुतारवाडी ग्रामपंचायत सदस्य राजा किरजत, तालुका सरचिटणीस नथुराम साळवी, महादेव सावंत, रोहा तालुका युवा मोर्चा उपाध्यक्ष हृषीकेश किरजत, समृद्धी साळवी, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस रविंद मामुलस्कर, रविंद्र शिंदे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, युवा वॉरियर्स जिल्हा संयोजक वैभव कुलकर्णी, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, सचिन मोरे, शुभम सावंत, विलास लाड, हेमंत मढवी, रुपेंद्र मळेकर आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री हरिभाऊ सखाराम पवार व संतोष बळीराम पाटील, राहणारः वारदोली, पो. अजिवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे. आर. प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| १७/२ | १ | ०-२७-३० | ०-०३-३० | ०-०३-६० | ६.१२ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/०८/२०२४**

**सही /-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)

**कार्यालयीन पत्ता :- बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री हरिभाऊ सखाराम पवार व संतोष बळीराम पाटील, राहणारः वारदोली, पो. अजिवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे. आर. प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| १६/५ | १ | ०-२३-७० | ०-०२-३० | ०-२६-०० | ४.८७ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/०८/२०२४**

**सही /-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)

**कार्यालयीन पत्ता :- बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

# स्वातंत्र्य दिनानिमित्त ठिकठिकाणी ध्वजारोहण उत्साहात

## सीकेटी विद्यालयात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्याचा ७८वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनाच्या या कार्यक्रमास आर. एच. पाटील उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद पालघर, संस्थेचे सचिव डॉ. एस टी गडदे, जगदीश घरत, संदीप पाटील, विजय म्हात्रे, हरचंद सिंग सग्गु, जयराम मुंबईकर, या पाहुण्यांची उपस्थिती लाभली. तसेच सीकेटी संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, माध्यमिक मराठी विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, उच्च माध्यमिक कला व वाणिज्य विभाग पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील, इंग्रजी माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

समारंभ अध्यक्ष वाय. टी. देशमुख आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, भारताने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे आपण जगाला गुणवान मनुष्यबळ पुरवत आहोत. आपण आदर्श नागरिक बनण्यासाठी शिस्त आणि वक्तशीरपणा बाळगला पाहिजे. भारताने केलेल्या प्रगतीमुळे आज भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

## उलवे नोड येथे परेश ठाकूर यांच्या हस्ते झेंडावंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शंकुतला रामशेठ ठाकुर स्कूलमध्ये ७८वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात झाला. हर घर तिरंगा अंतर्गत तीन दिवसांच्या ध्वजारोहणाचे कार्यक्रम झाले.

पहिल्या दिवशी ध्वजारोहण 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जोत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते, दुसऱ्या दिवशी भाजप उलवे नाड १चे अध्यक्ष तथा स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर यांच्या हस्ते तर तिसऱ्या म्हणजे १५ ऑगस्ट रोजी स्कूलचे चेअरमन तथा पनवेल मनपा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी त्यांच्यासोबत कविता खारकर, मधुकर खारकर, डॉ.श्रद्धा पाटील, जोस्त्ना ठाकूर, स्कुलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिकेतर कर्मचारी वर्ग इत्यादी लोक उपस्तित होते. दरम्यान, चेअरमन परेश ठाकूर यांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर विविध सांस्कृतिक कार्यकम झाले.






पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या शेलघर येथील शाळेत भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी कामगार नेते महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत, अमृत भगत, रतनशेठ भगत, रमेश भगत आदींसह पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## कोकण भवन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा वर्धापन दिन गुरुवारी कोकण भवन येथे जल्लोषात साजरा झाला. या वेळी कोकण विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू यांच्या हस्ते प्रांगणात ध्वजारोहण झाले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार मंदा म्हात्रे, अपर आयुक्त कोकण विभाग विकास पानसरे, उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पालांडे, उपायुक्त (पुनर्वसन) अमोल यादव, उपायुक्त (रोहयो) श्रीमती रेवती गायकर, उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, उपायुक्त (आस्थापना) मिनल कुटे,उपायुक्त (नियोजन) प्रमोद केंभवी, उपायुक्त (पुरवठा) अनिल टाकसाळे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश धुमाळ, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, माजी सैनिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरीक तसेच शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित होते.

या वेळी महसूल पंधरवड्यानिमित्त महसूल संवर्गातील पुनर्वसन शाखेचे उपायुक्त अमोल यादव, मुख्यमंत्री सचिवालय कक्षाच्या नायब



तहसिलदार दिपाली पुरारकर, नायब तहसिलदार सुहास सावंत यांच्यासह लघुलेखक संवर्ग, वरिष्ठ लेखापाल संवर्ग, अव्वल कारकून संवर्ग, महसूल सहाय्यक संवर्ग, आणि महसूल मित्र अशा उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पोलीस सेवेत उत्कृष्ट कार्य करणारे नेरुळ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आकाश धनसिंग ठाकरे, तुर्भे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण भगवान वाघ आणि तुकाराम सुरेश नांगरे, वाशी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक रमेश आनंदा पाटील, सानपाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल रामराव मुंडे, कळवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सतीश शाहूराव नवले, नाव्हाशेवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भरत पोफळे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.




नवीन पनवेल : स्वातंत्र्य दिनानिमित्त डिएसआरफ ट्रस्टच्या वतीने नील हॉस्पिटल येथे ध्वजारोहण, ध्वजवंदन तसेच भारतमाता पुजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी डॉ. शुभदा नील प्रमुख पाहुण्या म्हणुन उपस्थित राहिल्या. त्यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



पनवेल : स्वातंत्र्य दिनाचे औचित्यसाधून वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचा ५१ वा रिक्षा स्टॅण्ड नंदनवन कॉम्प्लेक्स समोर सुरू झाला आहे. या आरटीओ मान्यता प्राप्त महानगरमान्यता प्राप्त आणि आरटीओ मान्यता प्राप्त स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा चालम मालक संघटनेच्या रिक्षा स्टॅण्डचे वंदे मातरम कामगार संघटेचे उपाध्यक्ष रवी नाईक यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन झाले. या वेळी दिनेश केकाने, नाका अध्यक्ष राजपाल शेगोकार, उपनाका अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, सेक्रेटरी कांचन पालकर, प्रेम जोशी, संजय खोपकर, प्रभाकर ढाकणे, अमित पवार, सुनील माळी, रोहित वाघमारे, दीपक पाटोळे, रमेश पाटील, गणेश बोराडे, बाबुराव आंग्रे, भूषण सूर्यवंशी, विजय देवडकर, संजय काळंगे आदी उपस्थित होते.



पनवेल : हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत उद्योजक मनोज आंग्रे यांनी त्यांच्या घरी राष्ट्रध्वज फडकविला. सोबत त्यांच्या पत्नी.

## तिरंग्याला मानवंदना



पनवेल : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेल केंद्र व पनवेल इंडस्ट्रियल कोऑप इस्टेटने मोठा उत्साहात स्वतंत्रता दिन साजरा केला. पनवेल इंडस्ट्रियल कोऑप इस्टेटचे अध्यक्ष विजय लोखंडे यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले. या वेळी संचालक सुनील सूचक, दीप लोखंडे, गौरव जोशी, सभासद कृतार्थ पटेल, अश्विन शाह, ॲड. सौरभ कांडपिळे, गौरांग कांडपिळे, व्यवस्थापक डी.डी. सावंत, बँक ऑफ महाराष्ट्राचे माजी शाखा प्रबंधक विजयकुमार पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे, वीरेंद्रकुमार श्रीवास्तव तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण, पनवेलचे केंद्र संचालक, दयानंद कदम, सहकारी हेमंत पाटील होते.



उरण : हर घर तिरंगा अभियानांतर्गत मंगळवारी पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांचे बंधू गजानन गावंड यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. या वेळी मुकुंद गावंड, शाळेचे चेअरमन जीवन गावंड, दहागाव माजी विद्यार्थी उपाध्यक्ष अनिल पाटील, प्राध्यापक बल्लाल मॅडम, पुरण पाटील, भगत सर, परेश पाटील आदी उपस्थित होते.



उरण : स्वातंत्र्य दिनानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने परेडचे आयोजन तसेच देशभक्तीपर गीते गायले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले. या वेळी विद्यालयाचे चंद्रकांत घरत, स्कूल कमिटी मेंबर शेखर तांडेल, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

रामप्रहर श्रावणधारा

### श्रावण आला पण...

श्रावण आला पण,
रेशीमधारा बरसल्याच नाही...!

श्रावण आला पण,
आकाशात घन निळा दिसलाच नाही...!

श्रावण आला पण,
रिमझिम धारांत भिजलोच नाही...!

श्रावण आला पण,
रानात मोराने पिसारा फुलवलाच नाही...!

श्रावण आला पण,
ऊन-सावलीचा खेळ दिसलाच नाही...!

श्रावण आला पण,
राधेला श्याम मुरारी भेटलाच नाही...!

श्रावण आला पण,
रानातील रंगांचे पक्षी उडालेच नाही...!

श्रावण आला पण,
आठवणींचा गंधित वारा वाहिलाच नाही...!

श्रावण आला पण,
शब्दांना सूर गवसलाच नाही...!



-अशोक गायकवाड,
पनवेल

## निवडक

### भाजपच्या वतीने नागोठण्यात वृक्षारोपण



**नागोठणे** : भाजपच्या वतीने ७८व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आणि पेण सुधागड मतदारसंघांचे कार्यसम्राट आमदार रविशेठ पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नागोठणे येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी गवळआळी स्मशानभूमी, मराठाआळी स्मशानभूमी व श्रृंगार तलाव या ठिकाणी वृक्षारोपण केले. या वेळी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकार, तालुका सरचिटणीस आनंद लाड, नगोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, क्रीडा सेल रोहा तालुकाध्यक्ष शेखर गोळे, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, संतोष लाड, शिक्षण सेल रोहा तालुकाध्यक्ष अशोक अहिरे, उपाध्यक्ष धनराज उमाळे, मराठी उद्योजक गणेश घाग, गवळआळी ग्रामस्थ नितिन घाग आदी उपस्थित होते.

### शिंगढोळमध्ये आयुर्वेदिक चिकित्सा

**कर्जत** : कर्जत प्रेस क्लबच्या वतीने स्व. आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने स्व. ज्योती रामदास घरत यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त एकता युवक मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ शिंगढोळ यांनी मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात १३० रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. शिबिराचे उद्घाटन डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते झाले. या वेळी स्व. आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, डॉ. ज्योती सातपुते, वसंत ठाकूर, अनिल हरपुडे, निलेश पिंपरकर, रमेश आहिर, भगवान डोंगरे, समीर साळोखे, महेश क्षीरसागर आदी उपस्थित होते. या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता यांच्यासह १० डॉक्टर आणि आरोग्य सेवकांनी आरोग्य सेवा दिली.






**माणगाव** : भारतीय स्वातंत्र्याच्या ७८व्या वर्धापनदिनानिमित्त माणगाव पोलीस परेड मैदान येथे उपविभागीय अधिकारी संदीपान सानप यांच्या हस्ते, नगरपंचायत कार्यालय येथे मुख्याधिकारी संतोष माळी तर विवा कॉलेज येथे सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. (छाया : सलीम शेख)

# रायगड पोलीस दलातील अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी ज्ञानदेव फडतरे, अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी विनीतकुमार जयवंत चौधरी, खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी गोविंद जुंदरे व खालापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजित अरविंद भुजबळ या रायगड पोलीस दलातील चार अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. त्यांचा स्वातंत्र्य दिनी गुरुवारी (दि.१५) पोलीस मुख्यालय रायगड येथे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यता आला.



## मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सत्कार

पेण उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी ज्ञानदेव फडतरे हे सन १९८९ साली पोलीस दलामध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून भरती झाले आहेत. त्यांना सन २०२२मध्ये पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्राप्त आहे. फडतरे यांनी गुन्ह्यांचा शोध घेण्याची क्षमता, कठोर परिश्रम व कर्तव्य, निष्ठेने गुंतागुंतीच्या गुन्ह्यांचीही उकल करण्यात यश मिळविले आहे. सन १९९३मधील मुंबई जातीय दंगली, बाबरी मस्जीद घटना, मुंबई साखळी बॉम्बस्फोट यांसारख्या कायदा व सुव्यस्थेच्या घटना तसेच २००५ व २०१७ मुंबई शहरातील महापुरामध्ये अत्यंत चांगल्याप्रकारे भूमिका बजावली आहे.

अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी विनीतकुमार जयवंत चौधरी हे महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सन १९९१मध्ये पोलीस उपनिरीक्षकपदी रुजू झालेले असून अत्यंत चांगले संवाद कौशल्य, कठोर मेहनत, कामाप्रती एकनिष्ठा अशा गुणांमुळे त्यांनी पोलीस दलातील स्वत:ची अशी एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे.

खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी गोविंद जुंदरे हे सन १९९०मध्ये नाशिक जिल्ह्यातील पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झालेले असून सन २०२३मध्ये खात्यांतर्गत परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नत झालेले आहेत. ते अत्यंत कार्यकुशल असून त्यांनी गुन्हे तपासात एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे.

खालापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजित अरविंद भुजबळ, यांनी सन २०२० ते २०२४ या कालावधीत आंतरराज्यीय न्यु बेस कॅम्प मुरकुटडोह, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये नक्षलग्रस्त विभागात चार वर्षे समाधानकारकपणे सेवा पूर्ण केल्याबद्दल कठीण व खडतर कामगिरी केली आहे.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, उप वनसंरक्षक राहुल पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, सार्वजानिक बांधकाम कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे यांच्यासह जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## रायगडात बांबू लागवडीला प्राधान्य देणार –जिल्हाधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात बांबू लागवडीला पोषक वातावरण आहे. त्यामुळे जिल्ह्यात बांबू लागवडीला प्राधान्य देणार असून जिल्ह्यात एक कोटी बांबू लावण्याचे उद्दीष्ट आहे. बांबू लागवड महिला बचत गटांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी (दि. १४) दिली.

महसूल विभगामार्फत जिल्ह्यात १ ते १५ ऑगस्ट या कालावधीत महसूल पंधरवडा साजरा करण्यात आला. या कालावधीत राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती देण्यासाठी बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी ही माहिती दिली. बांबू लागवडी बरोबरच जिल्ह्यात पांढरा कांदा लागवडीचे क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न आहे. पेण तालुक्यातील हमरापूर येथे गणेशमूर्ती कारखानदारांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

महसूल पंधरवड्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ जास्तीतजास्त महिलांना मिळावा यासाठी १५ तालुक्यांमध्ये शिबिरे आयोजित करण्यात आली. १५ हजार १८३ अर्जांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. ६७ हजार ९४१ अर्ज मंजूर करण्यात आले. २२ ठिकाणी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना शिबिरे आयोजित करण्यात आली. या योजनेतून ६१३ जणांना नियुक्तीपत्र देण्यात आली. सैनिकहो रायगड तुमच्यासाठी कार्यक्रम राबवून १५ जणांना तलाठी पदाची नियुक्तीपत्र देण्यात आली. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी १५ शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या योजनेसाठी ६४ अर्ज प्राप्त झाले. स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय या अंतर्गत सर्व कार्यालयांसाठी स्वच्छता स्पर्धा घेण्यात आली. २२ ठिकाणी कृषि मार्गदर्शक कार्यक्रम राबविण्यात आले.

शेती, पाऊस व दाखले उपक्रम राबविण्यात आला. युवा संवाद अंतर्गत २२ शिबिरे आयोजित करण्यात आली. महसूल जनसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महसूल ई–प्रणालीबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. १७ ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आली होती. एक हात मदतीचा– दिव्यांगांच्या कल्याणाचा १६ शिबिरे आयोजित करून १०२ उपकरणे वाटप करण्यात आली, तसेच ५४७ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी संवाद व प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

## सुरज उंदरे यांची जलसंपदा विभागात निवड

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वरसे ग्रामपंचायतमधील सुरज भास्कर उंदरे यांची महाराष्ट्र सरळ सेवा भरती २०२४ अंतर्गत जलसंपदा विभागातील स्थापत्य अभियांत्रिक सहाय्यक पदावर निवड झाली आहे. सुरज सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे सक्रिय सदस्य आहेत. सुरजच्या सन्मानार्थ ग्रामपंचायत आणि सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या वेळी सुरज यांचा शाल, श्रीफळ, भगवद्गीता व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेने सत्कार करण्यात आला.

या वेळी वरसे सरपंच अमित मोहिते, माजी सरपंच नरेश पाटील, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक रोशन चाफेकर, अध्यक्ष किरण कानाडे, पुंडलिक कडू उपस्थित होते.




## महादेववाडीमध्ये रस्ता काँक्रिटीकरणाचा शुभारंभ

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील महादेववाडीमध्ये सिमेंट काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ मंगळवार (दि. १३) राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस तथा ओबीसी जिल्हाध्यक्ष सुरेश मगर यांच्या हस्ते करण्यात आला.

खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून जवळपास १४ कोटींची विकासकामे या परिसरातील केली जात आहेत. यामुळे खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, मंत्री आदिती तटकरे यांचे आभार असे सुरेश मगर यांनी सांगितले. या वेळी उपसरपंच अरविंद मगर, सदस्य पांडुरंग हंबीर, सदस्या समिधा गणेश सुतार, सुनील जाधव, रत्नाकर चव्हाण, रवी जगंम, किशोर भगत, बळीराम सुतार, लक्ष्मण भगत, सुभाष पवार, सचिन पवार, सुरेश सुतार, विष्णू कोंदे, राजु सुतार यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

**माणगाव : बोंडशेत मानकरवाडी येथील पत्रकार एकनाथ मानकर यांच्या पत्नी कै. स्विता मानकर यांचे नुकतेच निधन झाल्याने आमदार भरत गोगावले व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मानकर कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. (छाया : सलीम शेख)**



## नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या नागरिकांचा सन्मान



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील ५० ग्रामस्थांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. त्यांचा सन्मान श्री छत्रपती शिवाजी मंडळ, कर्जत व लक्ष्मी नेत्रपेढी, पनवेलच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यापैकी काही जणांनी अवयवदान व देहदान करण्याचा निर्णयही घेतला आहे.

लक्ष्मी नेत्र पेढीचे प्रभारी डॉ. संकेत गांधी यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे विजय मांडे, डॉ. अलका जाधव, विजय हरिश्चंद्रे, दत्ता म्हसे आदी उपस्थित होते. माजी अध्यक्ष अशोक शिंदे, खजिनदार अरुण विशे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

शिंदे यांनी प्रास्ताविकात मंडळाच्या एकोणसत्तर वर्षांच्या वाटचालीची माहिती सांगितली. विजय हरिश्चंद्रे यांनी नेत्रदान उपक्रमाची माहिती देऊन जास्तीत जास्त जणांनी नेत्रदान करावे, असे आवाहन केले.

डॉ. गांधी यांनी दृश्राव्य पद्धतीने नेत्रदान कुणी, कसे, कधी करावे. कुणी करू नये. याची माहिती देऊन. नेत्रदान केलेल्याचे निधन झाल्यावर त्यांच्या नातेवाईकांनी धीर देऊन नेत्रदान करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना केली. या वेळी अरविंद पाटील, अर्जुन वाघ, राजन चौधरी यांनी नेत्रदान करताना येणाऱ्या शंका विचारल्या. डॉ. गांधी यांनी त्यांच्या स्स्यांचे समाधानकारक निरसन केले. त्यानंतर मांडे यांच्या हस्ते नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या नागरिकांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

विजय मांडे यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्यास अडचण येत असेल तर एक सर्व समावेशक समिती स्थापन करावी, असे सूचित करून गावागावात जाऊन नेत्रदानाचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे, सांगितले. दत्ता म्हसे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. विकास चित्ते यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी शुभांगी सुळे यांनी आल्या दोन कन्या मानसी व सुश्मिता यांच्यासमवेत, संतोष माळगुंडकर यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आपली पत्नी श्रुती यांच्यासह नेत्रदानाचा संकल्प केला. वृषाली मराठे यांनी आपला सुपुत्र अभिजीतसह नेत्रदानाचा संकल्प केला. संदीप मराठे यांनी आपल्या मातोश्री अर्चना व पत्नी साक्षी यांच्यासह, रमेश भागवत यांनी आपल्या पत्नी शोभा यांच्यासह, अरविंद रेगे यांनी आपली पत्नी अनिता यांच्यासह, जिग्नेश शहा यांनी आपली पत्नी निकिता यांच्यासह, प्रभाकर कुलकर्णी यांनी आपली पत्नी पद्मा यांच्यासह, राहुल तिटकारे यांनी आपली पत्नी वैशाली यांच्यासह आणि श्रीकृष्ण जोशी यांनी आपली पत्नी अनुराधा यांच्यासह नेत्रदानाचा संकल्प केला. याप्रसंगी वसंत ठाकूर, पंच्छी गुप्ता, हरिश्चंद्र राऊत, उमेश शेट्ये आदी उपस्थित होते.

## मुरूडमध्ये शिवस्मारक उभारणीकरिता निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड बाजारपेठ येथे असलेल्या पोलीस चौकीजवळील नगर परिषदेच्या जागेत राजे शिवछत्रपती महाराजांचे स्मारक उभे व्हावे याकरिता तालुका पद्मदुर्ग शिवस्मारक संघटनेने मुरूड नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांना निवेदन देण्यात आले. याची प्रत खासदार सुनील तटकरे, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी यांना देण्यात आली आहे.



या वेळी पद्मदुर्ग शिवस्मारक संघटना शिवप्रेमी प्रकाश चव्हाण, कुणाल सतविडकर, आदेश दांडेकर, स्वप्निल कवळे, जागन पुलेकर, किर्ती शहा, विजय सुर्वे, उमेश भोईर, ॲड. रूपेश पाटील उपस्थित होते.

निवेदन म्हटले आहे की, मुरूड तालुका हा एक ऐतिहासिक वारसा लाभलेला तालुका असून छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे. शहराच्या मध्यभागी जर शिवस्मारक झाले तर कित्येक शिवप्रेमीच्या मनातील वर्षानुवर्षे अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण होणार आहे. आमचे दैवत आपल्यासोबत कायम आहेत, याकरिता अशा स्वरूपाचे स्मारक शहराच्या मध्यभागी मुख्य बाजारपेठेत येथे असलेल्या पोलीस चौकीजवळील नगर परिषदेच्या मालकीच्या जागेमध्ये उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## दामतमधील मुस्लिम कार्यकर्ते शिवसेनेत

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळजवळील दामत गावातील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करीत आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मुस्लिम समाज शिवसेनेच्या पाठीशी असल्याचे मनोगत व्यक्त केले.

नेरळ जि. प. गटातील तौसीफ नजे यांच्या नेतृत्वाखाली जफर नजे, सिद्दिक नजे, सलमान नजे, सुफियान नजे, श्रीराज नजे, सलीम नजे, अमन नजे, अकिब नजे, सकलेन नजे, आरमान नजे, आरमान नजे, आमस नजे, नईम नजे, युसुफ नजे, अफजल नजे, रियाज चंदू, शहादा नजे, जमीर तांबोळी, असलम नाचन, आजम खोत, मोमीन नजे, अफजल नजे, नुरजहान बेगम, शेरबानू, सलमा, अब्दुल समद अन्सारी, रसीद नजे, शोयब नजे यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर, उप तालुका संघटक सुभाष मिणमिने, ग्रामपंचायत उप सरपंच किशोर घारे, माजी सरपंच असगर खोत, अबीत खोत आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेंद थोरवे यांनी कर्जतच्या विकासामध्ये सर्वधर्मियांचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण आज पक्षात प्रवेश करत आहात आपल्याला योग्य तो मानसन्मान दिला जाईल व आपली सर्व कामे पूर्ण केले जातील, तसेच ममदापूरपासून दामत भडवळकडे जाणारा रस्ता जवळ जवळ दीड कोटी रुपये, ममदापूर येथील शंभर वर्षे जुनी शाळा ७० लाख रुपये मंजूर करून दिले. त्या शाळेचे काम प्रगतीपथावर आहे. दामत येथील उर्दू शाळेला एक कोटी रुपयांची मागणी केली. गेली त्यातील ५० लाख रुपये मंजूर झाले. ५० लाख रुपये लवकरच मंजूर करण्याचे आश्वासन दिले आहे.



































नवीन इमारतीमध्ये पूर्ण साहित्यासह चालू स्थितीत असलेले हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क क्र.: ७३०३१८४८३३

पत्ता : सेक्टर – ४, गणेश नगर, करंजाडे, पनवेल (रायगड) ४१०२०६

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com